# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.07.2025** **वारःगुरुवार**

1. प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. मुस्कान आणि शोध मोहिमांद्वारे हजारो बेपत्ता महिला आणि बालकांचा शोध घेण्यात यश
3. राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेद्वारे महाराष्ट्रातल्या 16 बी.एड. महाविद्यालयांची मान्यता रद्द
4. सीमावादात अडकलेली वादग्रस्त 14 मराठी गावं लवकरच महाराष्ट्रात समाविष्ट होणार
5. गडचिरोली जिल्ह्यात स्वातंत्र्यानंतर प्रथमच अहेरी-मरकनार बससेवा सुरू आणि
6. केसरीचे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉक्टर दीपक टिळक अनंतात विलीन

**अश्विनी वैष्णव**

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं की पुढची 6 वर्षं देशातल्या 100 आकांक्षित जिल्ह्यांमधे ही योजना राबवण्यात येईल तसंच 11 विभागांमध्ये असलेल्या 36 विद्यमान योजनांच्या समन्वयानं कार्यान्वित केली जाईल. देशातल्या एक कोटी 70 लाख शेतकऱ्यांना त्याची मदत होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. अंतराळवीर शुभांशू शुक्लाच्या यशस्वी अंतराळ प्रवासानंतर त्यांचं आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं अभिनंदन करणारा प्रस्तावही बैठकीत मान्य करण्यात आला.

**मुख्यमंत्री-मुंबई**

मुस्कान आणि शोध मोहिमांद्वारे राज्यातील हजारो बेपत्ता महिला आणि बालकांचा शोध घेण्यात यश आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितलं. आमदार सुनील शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. बेपत्ता प्रकरणांच्या तपासासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात मिसिंग सेल स्थापन करण्यात आली असून अतिरिक्त पोलीस महासंचालक पदाच्या महिला अधिकाऱ्याकडं याची जबाबदारी असेल, असंही फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारच्या Missing Portal सोबत सर्व राज्यांना जोडण्यात आलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात औद्योगिक वीजदर अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वात कमी होणार आहेत. नवीन दरांनुसार सध्या महाराष्ट्राचा दर प्रति युनिट 8 पूर्णांक 32 रुपये आहे, पुढील टप्प्यात तो 7 पूर्णांक 38 रुपयांवर येणार आहे असं मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केलं. हे दीर्घकालीन करार असल्यामुळं विजेचे दर स्थिर राहतील, असंही फडणवीस म्हणाले.

**शिकवणी**

काही महाविद्यालयं थेट खासगी शिकवणी वर्गांसोबत करार आहेत, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी खासगी शिकवणी अधिनियम तयार करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. सदस्य हिरामण खोसकर यांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले की  या अधिनियमाच्या मसुद्याबाबत सदस्यांकडून सकारात्मक सूचना आल्यास त्यांचा विचार केला जाईल.

**बीएड महाविद्यालय**

राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेनं महाराष्ट्रातल्या 16 बी.एड. महाविद्यालयांची मान्यता रद्द केली आहे. यापैकी 9 महाविद्यालयं बंद असल्यानं तिथं विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले नाहीत. अन्य 7 महाविद्यालयांची प्रवेश क्षमता 500 असल्याची माहिती उच्च आणि

तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. नवीन शैक्षणिक धोरणानुसार चार वर्षांचा बी.एड. अभ्यासक्रम म्हणजेच एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम लागू करण्यात आला असल्याचंही पाटील यांनी सांगितलं.

**सीसीटीव्ही**

राज्यातल्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा कार्यक्रम शासनानं हाती घेतला आहे. त्यांच्या देखभालीची यंत्रणा उभी करण्यात यावी, अशी सूचना आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी काल विधानसभेत बोलताना केली. भविष्यकालीन आधुनिकतेचा विचार करून यंत्रसामग्री बसविली जाईल, असं आश्वासन शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिलं.

**महाराष्ट्र-तेलंगणा सीमावाद**

तेलंगणसोबत सीमावादात अडकलेल्या जिवती तालुक्यातील 14 मराठी गावं लवकरच महाराष्ट्रात समाविष्ट होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले असून, यावर अंतिम निर्णय लवकरच घेण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानभवनात झालेल्या बैठकीत दिली. गेल्या अनेक वर्षांपासून सीमावादामुळं प्रशासन, सुविधा, विकास योजनांचा लाभ याबाबतीत या गावांमध्ये संभ्रमाचं वातावरण होतं.

**दानवे निरोप**

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा विधान परिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ पुढच्या महिन्यात पूर्ण होत आहे. त्यांच्या कारकीर्दीला उजाळा देऊन काल सदनात त्यांना निरोप देण्यात आला. सदस्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

**संदेश**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात अस्थायी कॅज्युअल रिपोर्टरसाठी परिक्षा घेण्यात येणार आहे, त्याविषयीचा हा संदेश...

**बससेवा-गडचिरोली**

गडचिरोली पोलिस दलाच्या पुढाकारानं अहेरी-मरकनार या दुर्गम भागात प्रथमच बससेवा सुरू करण्यात आली. आमचे प्रतिनिधी जयंत निमगडे यांनी पाठविलेला हा वृत्तांत...

**अहेरी-मरकनार या बससेवेमुळे अतिदुर्गम परिसर असलेल्या मरकनार आणि अन्य गावांतल्या नागरिकांची तालुका मुख्यालयात येण्यासाठी होणारी पायपीट थांबणार आहे. बससेवा सुरु होताच नागरिकांनी राष्ट्रध्वज फडकावत जल्लोषात बसचं स्वागत केलं. भामरागड तालुका अतिदुर्गम असल्यानं या भागात दळणवळणाची फारशी साधनं उपलब्ध नाहीत. शिवाय अनेक वर्षे या तालुक्यात नक्षली कारवाया होत राहिल्यानं, नक्षल्यांनीही रस्ते आणि पुलांच्या बांधकामाला विरोध केला. या गावांमधील नागरिक अनेक वर्षांपासून हा त्रास सहन करीत होते. त्याअनुषंगानं पोलिस अधिकाऱ्यांनी परिवहन महामंडळाशी संपर्क साधून बससेवा सुरु केली. सामान्य नागरिकांसह याचा विद्यार्थ्यांनाही लाभ होणार आहे. पोलिसांच्या पुढाकारानं अतिदुर्गम भागात सुरु झालेली ही तिसरी बससेवा आहे. गावात एअरटेलचे टॉवरही बांधण्यात आले आहे.**

**झाडाचा वाढदिवस-रत्नागिरी**

रत्नागिरी तालुक्यातल्या धामणसे गावात ग्रामस्थांनी काल एका झाडाचा पहिला वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. या अनोख्या कार्यक्रमाविषयी हा वृत्तांत...

**आईच्या नावे एक झाड लावण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी 'मन की बात'मधून केलं होतं. त्या आवाहनाला प्रतिसाद देऊन रत्नागिरीतल्या धामणसे गावातल्या श्री रत्नेश्वर ग्रंथालयाचे अध्यक्ष उमेश कुळकर्णी यांनी आपल्या वाढदिवसाच्या औचित्याने ग्रंथालयाच्या आवारात कदंबाचं रोप लावलं होतं. आता त्या झाडाचा पहिला वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री रत्नेश्वर ग्रंथालयाचं सुवर्णमहोत्सवी वर्ष सध्या सुरू असून, त्यासाठी मोफत जागा देणाऱ्यांच्या आईचं म्हणजेच दिवंगत शकुंतला कानडे यांचं नाव उत्सवमूर्ती कदंबरोपाला देण्यात आलं. त्या रोपाला विद्यार्थ्यांनी पुष्पहार घातले आणि कलिंगड कापून आनंद साजरा केला. 'आपण आई-वडिलांची सेवा करतो, त्याप्रमाणे आपण लावलेल्या**

**झाडाची निगा राखणंही गरजेचं आहे, या विचाराने आम्ही ग्रामस्थांनी मिळून या झाडाचा वाढदिवस साजरा केला,' अशी भावना कुळकर्णी यांनी व्यक्त केली. त्यांनी गेल्या वर्षी आपल्या आईच्या नावे विद्यार्थी आणि ग्रामस्थांना 500 रोपांचं मोफत वाटप केलं होतं. गावाच्या विकासात योगदान असलेल्या दिवंगत व्यक्तींच्या नावे यंदाही 600 रोपं वाटण्यात आली. त्यात काजू, बेल, चिंच, आवळा, सोनचाफा, पेरू, खैर, साग, कडुनिंब अशा रोपांचा समावेश आहे. वनराजी वाढण्यासाठी अशा कृतिशील उपक्रमांचीच गरज आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**पुरस्कार-अकोला**

अकोला जिल्ह्याला कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी केंद्रीय विशेष उल्लेखनीय पुरस्कार मिळाला आहे. कापूस उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातली अकोल्याची प्रगती आणि औद्योगिक विकास यासाठी ही निवड करण्यात आली. अकृषी क्षेत्रात पुरस्कार मिळवणारा अकोला हा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा ठरला आहे.

**क्षयरोग-धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील 82 ग्रामपंचायतींना क्षयरोगमुक्त घोषित करण्यात आल्या आहेत. काल एका सोहळ्यात त्यांचा सत्कार करण्यात आला. गेल्या वर्षभरात 'क्षयरोगमुक्त गाव, माझी जबाबदारी' या संकल्पनेअंतर्गत ग्रामपंचायतींमध्ये संशयित क्षयरुग्णांचा शोध, जनजागृती, थुंकी नमुन्यांची तपासणी आदी उपक्रम राबविण्यात आले अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉक्टर अभिजीत बनसोडे यांनी दिली.

**जागतिक वारसास्थळ-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या ऐतिहासिक किल्ले सिंधुदुर्ग आणि विजयदुर्गचा युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळ यादीत समावेश झाल्यानं सिंधुदुर्ग जिल्हयात आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. पर्यटन जिल्हा असलेल्या सिंधुदुर्गमधल्या पर्यटन आणि ऐतिहासिक संशोधनाला यामुळं चालना मिळणार आहे.

**डॉ. दीपक टिळक-निधन**

केसरीचे विश्वस्त-संपादक आणि लोकमान्य टिळक यांचे पणतू डॉ. दीपक टिळक यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पत्रकारिता, शैक्षणिक, राजकीय, समाजिक, साहित्य यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते. डॉ. दीपक टिळक यांचं काल सकाळी अल्पशा आजारानं निधन झालं. ते 72 वर्षांचे होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती आणि लोकमान्य टिळक यांनी स्थापन केलेल्या अनेक संस्थांचे ते आधारवड होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी लोकमान्यांनी स्थापन केलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला डॉक्टर दीपक टिळक यांच्या कार्यकाळात मोठी उंची प्राप्त झाली. लोकमान्यांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचा वारसाही त्यांनी पुढे नेला. शैक्षणिक क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातील डॉक्टर दीपक टिळक यांनी केलेलं कार्य मोलाचं ठरलं. डॉ. दीपक टिळक यांच्या निधनानं लोकाभिमुख सामाजिक संस्थांचा आधारस्तंभ हरपला अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली. तर एक विचारवंत, कुशल प्रशासक, संवेदनशील पत्रकार आणि समर्पित समाजसेवक हरपला अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ. टिळक यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**हवामान**

मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अन्यत्र हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.